



दैनिक

अचूक वेध, अचूक बातमी

# अक्षराज

संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध

Email : newsaksharaj2021@gmail.com

खालील (क्यू आर कोड) स्कॅन करा...
आणि अक्षराज मीडियाच्या व्हाट्सअप चॅनल ला फॉलो करा व मिळवा सर्व घडामोडींचे अपडेट्स एकाच वेळी एकाच ठिकाणी...
कृपया इथे स्कॅन करा
Plz Scan Here

वर्ष : ०५ | अंक : २८६, पाने : ०४, किंमत : ०३ रुपये | बुलडाणा, गुरुवार, दि.२८ मे २०२६ | संपादक : विनोद कैलास गोरे | RNI NO. : MAHMAR/2022/82056

## शिवसेना, राष्ट्रवादी नंतर आणखी एक मोठा पक्ष फुटणार?

### २० खासदार, ५० आमदार भाजपच्या वाटेवर असल्याचा दावा



**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.२७, कोलकाता :** शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेस यांच्यात उभी फूट पडल्यानंतर आता आणखी एक मोठा पक्ष फुटण्याची शक्यता निर्माण झाली आहे. पश्चिम बंगालमध्ये तब्बल १५ वर्षे सत्तेत राहिलेल्या तृणमूल काँग्रेसमध्ये सध्या सारं काही आलबेल नाही. राज्यात पहिल्यांदाच भारतीय जनता पक्षाची सत्ता आल्यावर तृणमूल काँग्रेसमध्ये अस्वस्थता आहे. आमदार, खासदारांना सत्तेसोबत जाण्याची गरज वाटू लागली आहे.

मुख्यमंत्री सुवेंदू अधिकारी यांनी बोलावलेल्या बैठकीला बारासातच्या खासदार काकोली घोष दस्तीदार उपस्थित होत्या. त्यांच्या सोबत तृणमूलचे सहा आमदारदेखील बैठकीला हजर होते. माजी मुख्यमंत्री आणि तृणमूल काँग्रेसच्या अध्यक्षा ममता बॅनर्जी यांच्या निकटवर्तीय मानल्या जाणाऱ्या काकोली घोष यांनी बुधवारी पक्षातील सर्व पदांचा राजीनामा दिला. याआधी घोष यांनी बारासातच्या जिल्हाध्यक्षपदाचा राजीनामा दिला होता. यानंतर भाजपचे वरिष्ठ नेते आणि बांकुडचे खासदार सौमित्र खान यांनी सनसनाटी दावा केला आहे.

तृणमूल काँग्रेस चे जवळपास ५० आमदार आणि २० खासदार भाजपमध्ये येण्यास तयार आहेत. आमदार, खासदार भाजपच्या संपर्कात असून नेतृत्त्वाकडून हिरवा कंदील मिळताच पक्षांतर करतील, असा खळबळजनक दावा खासदार सौमित्र खान यांनी केला. भाजपच्या केंद्रीय नेतृत्त्वानं जर का एकदा ठरवलं, तर तृणमूल काँग्रेस नावाचा कोणताही पक्षच राहणार नाही. कारण प्रत्येकाला भाजपमध्ये यायचं आहे, असं खान म्हणाले. सौमित्र खान यांनी तृणमूल काँग्रेसचे नेते आणि ममता बॅनर्जी यांचे भाचे अभिषेक बॅनर्जी यांच्यावर जोरदार हल्ला चढवला. 'ज्यांनी पापं केली आहेत, त्यांच्या घरासमोर आज बुलडोझर उभा आहे. २०२१ मध्ये याच अभिषेक बॅनर्जींनी भाजप कार्यकर्त्यांची घरं पाडली आहेत. आता त्यांच्यावर तीच वेळ आली आहे. त्यांनी नरकात जायला हवं,' अशा तिखट शब्दांत खान यांनी बॅनर्जींवर टीका केली.

तृणमूल काँग्रेसचे ५० आमदार आणि २० खासदार फुटतील, असा दावा सौमित्र खान यांनी केला आहे. विधानसभा निवडणुकीत झालेल्या पराभवातून बाहेर पडण्याचा प्रयत्न तृणमूल काँग्रेसकडून सुरू आहे. तृणमूलमध्ये अंतर्गत नाराजी आहे. बारासातच्या खासदार काकोली घोष दस्तीदार यांना तृणमूल काँग्रेसनं लोकसभेतून मुख्य प्रतोद पदावरुन हटवलं आहे. यानंतर घोष यांना केंद्र सरकारनं तातडीनं वाय दर्जाची सुरक्षा दिली आहे. काकोली घोष यांची भाजप सोबत जवळीक वाढत आहे.

## राहुरी पोलिसांची अवैध धंद्यांवर धडक कारवाई; ७ अवैध दारू विक्रेते व ३ जुगार अड्ड्यांवर गुन्हे दाखल




**अक्षराज : प्रमोद डफळ**

**दि.२७, राहुरी :** राहुरी पोलीस स्टेशन हद्दीत सुरू असलेल्या अवैध धंद्यांविरोधात राहुरी पोलिसांनी मोठी मोहीम राबवत अवैध दारू विक्री व जुगार अड्ड्यांवर धडक कारवाई केली आहे. या कारवाईत तब्बल ७ अवैध दारू विक्रेत्यांविरुद्ध तसेच ३ जुगार अड्ड्यांवर गुन्हे दाखल करण्यात आले असून, एकूण १८ हजार ८६० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

मा. मुम्मका सुदर्शन, पोलीस अधीक्षक, अहिल्यानगर यांच्या आदेशानुसार तसेच पोलीस निरीक्षक संजय ठेंगे यांच्या मार्गदर्शनाखाली दिनांक २६ मे ते २७ मे २०२६ दरम्यान राहुरी तालुक्यात विशेष मोहीम राबविण्यात आली. अवैध धंद्यांची माहिती काढून संबंधितांवर कठोर कारवाई करण्यासाठी राहुरी पोलीस स्टेशनच्या अधिकारी व अंमलदारांचे विशेष पथक तयार करण्यात आले होते.

या पथकाने राहुरी पोलीस स्टेशन हद्दीतील विविध भागांत गुप्त माहितीच्या आधारे छापेमारी करत अवैध दारू विक्री व जुगार सुरू असलेल्या ठिकाणांवर धडक कारवाई केली. बीट अधिकारी व पोलीस अंमलदारांनी अवैध धंद्यांची माहिती संकलित करून एकूण १० ठिकाणी छापे टाकले. या कारवाईदरम्यान ७ अवैध दारू विक्रेत्यांविरुद्ध आणि ३ अवैध जुगार अड्ड्यांवर गुन्हे दाखल करण्यात आले असून, पोलिसांनी रोख रक्कम व इतर साहित्य असा मिळून १८ हजार ८६० रुपयांचा मुद्देमाल हस्तगत केला आहे.

सदर कारवाई मा. मुम्मका सुदर्शन, पोलीस अधीक्षक, अहिल्यानगर, मा. सोमनाथ वाघचौरे, अपर पोलीस अधीक्षक, श्रीरामपूर तसेच मा. जयदत्त भवर, उपविभागीय पोलीस अधिकारी, श्रीरामपूर विभाग यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. पोलीस निरीक्षक संजय आर. ठेंगे यांच्या नेतृत्वाखाली पोहेकॉ राहुल यादव, पोहेकॉ हनुमंत आव्हाड, पोहेकॉ संदीप ठाणगे, पोना अशोक कुदळे तसेच पोहेकॉ अशोक शिंदे यांनी ही कारवाई पार पाडली.

राहुरी पोलीस स्टेशन हद्दीत कोणत्याही ठिकाणी अवैध दारू विक्री, जुगार किंवा इतर अवैध धंदे सुरू असल्याची माहिती मिळाल्यास नागरिकांनी तात्काळ राहुरी पोलीस स्टेशनच्या ०२४२६-२३२४३३ या क्रमांकावर किंवा डायल ११२ वर संपर्क साधावा, असे आवाहन पोलिसांच्या वतीने करण्यात आले आहे.

राहुरी पोलिसांच्या या धडक कारवाईमुळे अवैध धंदे करणाऱ्यांमध्ये खळबळ उडाली असून, आगामी काळात अशा कारवाया आणखी तीव्र करण्यात येणार असल्याचे संकेत पोलीस प्रशासनाकडून देण्यात आले आहेत.

## अधिक मासातील कमला एकादशी निमित्त विठ्ठल –रुक्मीणी मंदिरात फुलांची सजावट



**अक्षराज: विकास सरवळे**

**दि.२७, पंढरपूर :** अधिक तथा पुरुषोत्तम मासातील कमला एकादशी निमित्त श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर आकर्षक फुलांची सजावट करण्यात आली आहे. श्री विठ्ठल भक्त पुणे येथील राम जांभुळकर यांनी सेवाभावी तत्त्वावर फुलांची व पानांची भव्य सजावट केली आहे. या सजावटीसाठी झेंडू, शेवंती, ॲस्टर, गुलाब, निशिगंधा, तगर, लक्ष्मी कमळ, तुळशी, सूर्यफूल, ऑर्किड, अँथोरियम, कार्नेशन, जिप्सो, जरबेरा, कामिनी, अशोकाची पाने, ड्रेसिना, टेबल पाम, पिंक डेझी, ब्लू डेझी, सॅगऑफ, मनीप्लांट आदी बावीस प्रकारच्या फुलांचा व पानांचा वापर करण्यात आला आहे. मंदिरातील चौखांबी, चोळखांबी, श्री संत नामदेव पायरी, व्हीआयपी गेट तसेच इतर प्रमुख ठिकाणी सुमारे एक ते दीड टन विविध फुले वापरून आकर्षक सजावट करण्यात आली असल्याची माहिती व्यवस्थापक प्रविणकुमार घम यांनी दिली.

## खा. धानोरकर यांच्या संवेदनशीलतेने रुग्णांना मिळाला मायेचा आधार



**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.२७, चंद्रपूर :** केवळ प्रशासनावर वचक न ठेवता रुग्णांचे दु:ख समजून घेणारा आणि त्यांच्या अडीअडचणीत मायेची फुंकर घालणारा लोकप्रतिनिधी कसा असावा, याचा प्रत्यय मंगळवारला चंद्रपूर शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात पाहायला मिळाला. काही दिवसांपूर्वी याच रुग्णालयातील विदारक अवस्था पाहून संतापलेल्या खासदार प्रतिभा धानोरकर यांनी मंगळवार ला घेतलेल्या फेरभेटीत एक वेगळेच भावनिक रुप समोर आले आहे. त्यांनी ओ. पी. डी. सह थेट आय. सी. यू. वार्ड गाठत प्रत्येक खाटांपाशी जाऊन रुग्णांशी आणि त्यांच्या नातेवाईकांशी अत्यंत आस्थेने विचारपूस केली. खासदार महोदयांनी थेट संवाद साधत अनेकांच्या वेदना समजून घेतल्या आणि त्यांच्या समस्या जागच्या जागीच निकाली काढल्या.

खासदारांनी दाखवलेल्या या आपुलकीमुळे रुग्णांना आणि त्यांच्या हताश नातेवाईकांना मोठा भावनिक धीर मिळाला. या फेरी भेटी दरम्यान रुग्णालयचे अधिष्ठाता डॉ.मिलिंद कांबळे आणि जिल्हा वैद्यकीय शल्यचिकित्सक इतर वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. काही दिवसांपूर्वी खासदार प्रतिभा धानोरकर यांनी रुग्णालयाला दिलेल्या अचानक भेटीत रुग्णांचे आणि त्यांच्या नातेवाईकांचे प्रचंड हाल होत असल्याचे समोर आले होते. जिल्ह्याचे तापमान ४५ अंशाच्या पार असतानाही रुग्णांच्या नातेवाईकांसाठी साधे कुलर नसणे, पिण्याच्या पाण्याची दयनीय अवस्था आणि कर्तव्यावर असलेले वैद्यकीय अधिकारी गायब असणे, अशा गंभीर बाबी उघडकीस आल्या होत्या. तसेच, स्वच्छतेवर दरवर्षी कोट्यावधी रुपये खर्च होत असूनही महिला प्रभागातील तुंबलेली स्वच्छागृहे, फुटलेल्या नाल्या आणि पसरलेले घाणीचे साम्राज्य पाहून खासदारांनी प्रशासनाला धारेवर धरले होते. महिलांच्या आरोग्याशी होणारी तडजोड कदापि सहन केली जाणार नाही, असे स्पष्ट करत त्यांनी परिस्थिती सुधारण्यासाठी ८ दिवसाची मुदत दिली होती, अन्यथी रुग्णालयातच बसून उग्र आंदोलन करण्याचा इशारा दिला होता. खासदार धानोरकर यांच्या या आक्रमक भूमिकेनंतर रुग्णालय प्रशासनाने युध्दपातळीवर काम करत त्रुटी दूर करण्यास सुरुवात केली. खासदार काल महोदयांनी रुग्णालयाला पुन्हा भेट देऊन केलेल्या कामांची प्रत्यक्ष पाहणी केली असता, प्रशासनाने बहुतांश व्यवस्था सुरळीत केल्याचे दिसून आले. पाणीपुरवठा आणि स्वच्छता प्रश्न बऱ्यापैकी मार्गी लागल्याने त्यांनी प्रशासकीय प्रयत्नांबद्दल समाधान व्यक्त केले.

**स्वच्छतागृहाचे बांधकाम पूर्ण करा : खा. धानोरकर**

रुग्णांच्या नातेवाईकांसाठी महानगरपालिकेतर्फे बांधण्यात येत असलेले स्वच्छतागृह अजूनही अपूर्ण असल्याचे दिसताच, खासदार धानोरकर यांनी थेट मनपा आयुक्तांशी भ्रमणध्वनीवरुन संपर्क साधला व सदर बांधकाम तात्काळ पूर्ण करुन ते सुरु करण्याचे निर्देश दिले. त्यावर आयुक्तांनीही येत्या काही दिवसातच हे स्वच्छतागृह नागरिकांसाठी खुले करण्याची ग्वाही दिली. रुग्णांची गैरसोय पूर्णपणे दूर व्हावी यासाठी खासदार धानोरकर यांनी प्रशासनाला आणखी काही महत्वपूर्ण आणि कडक सूचना केल्या आहेत.

## नालेसफाईची कामे युद्धपातळीवर पूर्ण करावीत - आयुक्त राव




**अक्षराज : जे.के.पोळ**

**दि.२७, ठाणे :** महानगरपालिका क्षेत्रातील नालेसफाईची कामे पूर्ण करत असताना कामाचा दर्जा, कामाची गती आणि वेळेत कामे पूर्ण करण्यावर भर द्यावा, नालेसफाईची उर्वरित कामे ५ जूनपर्यत युद्धपातळीवर पूर्ण होतील या दृष्टीने नियोजन करुन आवश्यक त्या ठिकाणी अतिरिक्त मनुष्यबळ, यंत्रसामुग्री उपलब्ध करण्याचे निर्देश आज झालेल्या बैठकीत आयुक्त सौरभ राव यांनी दिले.

ठाणे महापालिका क्षेत्रात सुरू असलेल्या नालेसफाईच्या कामाचा प्रभागसमिती निहाय आढावा आयुक्तांनी घेतला. या बैठकीस उपायुक्त मधुकर बोडके, दीपक झिंजाड, डॉ. मिताली संचेती, आरोग्य अधिकारी डॉ. राणी शिंदे, सर्व प्रभागसमितीचे सहायक आयुक्त व कार्यकारी अभियंता उपस्थित होते.

ज्या परिसरात नालेसफाईची कामे सुरू आहेत, किंबहुना ज्या ठिकाणी काम करताना अडचणी निर्माण होत असतील तर त्या ठिकाणच्या स्थानिक लोकप्रतिनिधींशी संपर्क ठेवावा, त्यांच्याकडून नालेसफाईबाबत ज्या सूचना येतील त्याची अंमलबजावणी करावी अशा सूचना सर्व सहायक आयुक्तांना दिल्या.

तसेच ज्या ज्या ठिकाणी सखल भाग आहेत, जेथे दरवर्षी पाणी साचते, अशा ठिकाणी जवळपास १०२ पंप बसविण्याची कार्यवाही करण्यात येत आहे, अतिवृष्टीच्या काळात सखल भागात पाणी साचल्यास त्या ठिकाणी पंप ऑपरेटरची व्यवस्था करणे तसेच पंप बंद पडल्यास तात्काळ कार्यवाही होईल याबाबत नियोजन करावे, शहरातील संवेदनशील आणि पूरप्रवण ठिकाणी विशेष लक्ष ठेवून उपाययोजना राबविण्याच्या सूचना आयुक्तांनी अधिकाऱ्यांना दिल्या.

नालेसफाईदरम्यान काढण्यात येणारा गाळ तातडीने उचलून त्याची विल्हेवाट लावण्याचे निर्देश देण्यात आले. तसेच रेल्वे हद्दीलगत असलेल्या कल्व्हर्ट, नाले, खाडीमुख आउटलेट्सची पाहणी करून आवश्यक त्या उपाययोजना कराव्यात तसेच ज्या ठिकाणी मनुष्यबळाची कमतरता भासत असेल त्या ठिकाणी अतिरिक्त मनुष्यबळ उपलब्ध करण्याच्या सूचनाही बैठकीत देण्यात आल्या.

नालेसफाईची कामांचा दैनंदिन आढावा घेवून केलेल्या कामाचा तपशील ठेवावा, आवश्यक त्या ठिकाणी अतिरिक्त मनुष्यबळ लावून ५ जूनपर्यत समाधानकारक काम झाले पाहिजे असे निर्देश त्यांनी सर्व संबंधितांना बैठकीत दिले.

## बकरी ईदसाठी पनवेल मनपाचे चोख नियोजन




**अक्षराज : जे.के.पोळ**

**दि.२७, पनवेल :** महानगरपालिका क्षेत्रात दिनांक २८ मे २०२६ ते ३० मे २०२६ दरम्यान बकरी ईद सण साजरा करण्यात येणार असून, सदर सणाच्या पार्श्वभूमीवर महापौर नितीन पाटील व आयुक्त मंगेश चितळे यांनी दिलेल्या सूचनांनूसार आवश्यक पूर्वतयारी व नियोजन पुर्ण झाले आहे.

महापालिका मुख्यालयात झालेल्या बैठकीत महापौरांनी दिलेल्या सूचनांनूसार तात्पुरत्या कत्तलखान्यांसाठी शासनाकडून प्राप्त सूचनांचे, कायदे व नियम, तसेच उच्च न्यायालयाच्या आदेशाचे काटेकोर पालन केले जात आहे. कुर्बानीनंतर निर्माण होणाऱ्या अवशेषांची योग्य विल्हेवाट लावणेबाबत कामी महापालिकेच्या स्वच्छता निरीक्षकांना विशेष सूचना देण्यात आल्या आहेत. याकरीता प्रभाग २ साठी स्वच्छता निरीक्षक अजिंक्य दळवी (मो.नं. ७७१००८५००५), प्रभाग ३ साठी स्वच्छता निरीक्षक कुणाल गायकवाड (मो.नं. ९८२०३७३१७१) तसेच प्रभाग १४ साठी स्वच्छता निरीक्षक साठी मिथुन पवार (मो.नं. ७०२१७९१३२६) यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

तसेच सणाच्या पार्श्वभूमीवर स्वच्छता व नियोजनासाठी प्रभागवार संबधित अधिकारी व स्वच्छता निरीक्षकांची नियुक्ती करण्यात आली असून यांची यादी वेबसाईट तसेच सोशल मिडीयावर प्रसिद्ध करण्यात आली आहे.बकरी ईद सणाच्या अनुषंगाने मांस वाहतूक करताना स्वच्छता व सुरक्षिततेचे नियम पाळणे आवश्यक आहे, तसेच नियमांचे उल्लंघन झाल्यास संबंधितांवर कायदेशीर कारवाई करण्यात येईल असे महापालिकेच्या वतीने स्पष्ट करण्यात आले. महानगरपालिकेमार्फत बकरी ईद सण शांततापूर्ण, स्वच्छ व सुव्यवस्थित वातावरणात पार पाडण्यासाठी सर्व विभागांना आवश्यक सूचना देण्यात आल्या आहेत. पोलिस बंदोबस्त तसेच स्वच्छता निरीक्षकांमार्फत स्वच्छता व्यवस्था ठेवण्यात येत आहे, मागील वर्षीप्रमाणेच या वर्षीदेखील प्रशासनाकडून चोख व्यवस्था करण्यात आली आहे.

## थोडक्यात

### मुख्य वनसंरक्षक यांचे आंदोलकांना चर्चेचे निमंत्रण बेमुदत ठिय्या आंदोलन सुरूच




**अक्षराज : सुरेश संकपाळ**

**दि.२७, पाटण :** कोयनाधरणग्रस्त अभयारण्यग्रस्त संग्राम संघटनेच्या वतीने कोयना नगर येथील रासाटी परिसरात विविध प्रलंबित प्रश्नांबाबत गेल्या तीन दिवसांपासून ठिय्या आंदोलन सुरू आहे. आंदोलनाच्या तिसऱ्या दिवशी वन विभागाच्या अधिकाऱ्यांनी आंदोलनस्थळी भेट देत आंदोलकांशी चर्चा केली.

यावेळी वन विभागाचे वनक्षेत्रपाल अक्षय साळुंखे तसेच कोयना नगर पोलीस स्टेशन चे सहायक पोलीस निरीक्षक शंकर ओलेकर यांनी आंदोलकांची भेट घेतली. त्यांनी उपसंचालक किरण जगताप यांचे मुख्य वनसंरक्षक तुषार चव्हाण यांच्या समवेत सकारात्मक चर्चा घडवून आणण्यासाठीचे पत्र देत आंदोलन मागे घेण्याची विनंती केली.

प्रलंबित विषयांवर सकारात्मक चर्चा होऊन त्यातून मार्ग काढला जाईल व प्रश्न लवकरात लवकर सोडवले जातील, असे आश्वासन यावेळी आंदोलकांना देण्यात आले. अधिकाऱ्यांच्या विनंतीचा मान राखत आंदोलकांनी आंदोलनातील उपस्थिती कमी करण्याचा निर्णय घेतला असून चर्चेनंतर पुढील आंदोलनाबाबत योग्य निर्णय घेतला जाईल, असे आंदोलकांनी स्पष्ट केले.

दरम्यान, आंदोलनाच्या तिसऱ्या दिवशी पाटण पंचायत समिती सदस्या मंगल माने यांनी आंदोलनस्थळी भेट देऊन आंदोलकांची विचारपूस केली. त्यांनी आंदोलकांचे प्रश्न समजून घेत शक्य ते सर्व प्रयत्न करण्याचे आश्वासन दिले.

---

### पर्यावरण संरक्षण मंच ऊभारणार भव्य 'मानवी' साखळी




**अक्षराज : अनंत बोरसे**

**दि.२७, शहापूर (ठाणे) :** गेल्या काही दिवसांपासून शहापूरच्या तापमानवाढीचा मुद्दा ऐरणीवर आला आहे, याबाबत शहापूरातील नागरिकांनी पुढाकार घेऊन 'शहापूर पर्यावरण रक्षण मंचा' ची स्थापना केली. या मंचाच्या वतीने काही दिवसांपूर्वी खासदार बाळ्या मामा म्हात्रे यांची देखील भेट घेऊन त्यांना निवेदन दिले होते, तसेच मंचाच्या वतीने शहापूर नगरपंचायत प्रशासनाकडे निवेदन सादर केले होते. या संदर्भात गेल्या आठवड्यात सामाजिक कार्यकर्ते संतोष शिंदे व सौ. रजनी शिंदे यांनी नगरपंचायत प्रशासनाबरोबर बैठक देखील आयोजित केली होती.

त्यावेळी नगरपंचायत पंचायत, शहापूर येथे मंचचे पदाधिकार, सदस्य आणि नगरपंचायत अधिकारी तसेच नगरसेवक/नगरसेविका यांच्यात बैठक घेण्यात आली आणि या बैठकीत शहापूर परिसरात जल संधारण तसेच वृक्षलागवड करण्याबाबत विविध पर्यायांवर चर्चा करण्यात आली. नगरपंचायत प्रशासनादेखील या बाबत सकारात्मक प्रतिसाद देण्याचे आश्वासन दिले आणि लवकरच याबाबत पुन्हा बैठक घेऊन रोड मॅप कसा तयार करायचा हे ठरविण्यात येईल असे आश्वासन दिले.

तसेच जास्तीत जास्त लोकसहभाग व्हावा, जनजागृती व्हावी यासाठी सर्वांनी प्रयत्न करण्याचे ठरविण्यात आले,याचाच पुढील टप्पा म्हणून येत्या रविवारी शहापूर मधे मानवी साखळी ऊभारण्यात येणार आहे, यासाठी संतोषभाऊ शिंदे आणि मंचाचे अनेक सहकारी शहापूर मधील विविध संस्था, सामाजिक कार्यकर्ते, समाजातील विविध मान्यवर यांना प्रत्यक्ष भेटुन सहकार्याचे आवाहन करत आहेत. हा विषय राजकारणाचा नाही तर पर्यावरणाचा आणि सगळ्यांच्या जिव्हाळ्याचा विषय आहे तेव्हा याबाबत नगरपंचायत प्रशासनाने गांभीर्याने प्रयत्न करायला हवेत असे मत संतोष शिंदे यांनी व्यक्त केले.

---

### प्राचार्या डॉ.पौर्णिमा एकनाथ सुर्वे यांना राष्ट्रीय कार्य दर्पण सन्मान पुरस्कार जाहीर



**अक्षराज : रविंद्र खाडे**

**दि.२७, शहापूर (ठाणे) :** शिवाजीराव एस.जोंधळे इन्स्टिट्यूट ऑफ लॉ अँड रिसर्च सेंटर आसनगावच्या प्राचार्या डॉ. पौर्णिमा एकनाथ सुर्वे यांना महाराष्ट्र लोककल्याणकारी सेवा संस्थेतर्फे राष्ट्रीय कार्य दर्पण सन्मान पुरस्कार जाहीर झाला आहे.मुंबई मराठी पत्रकार संघाच्या भवनामध्ये १३ जून रोजी होणाऱ्या कार्यक्रमामध्ये त्यांना गौरविण्यात येणार आहे. कार्य दर्पणच्या संचालिका सलमा एन. खान यांनी यासंदर्भात लेखी पत्राद्वारे डॉ. पौर्णिमा एकनाथ सुर्वे यांना उपस्थित राहण्याबाबत सूचित केले आहे.

डॉ.सुर्वे या सध्या शिवाजीराव एस.जोंधळे इन्स्टिट्यूट ऑफ लॉ अँड रिसर्च सेंटर आसनगावच्या प्राचार्या म्हणून कार्यरत आहेत. विद्यार्थी वर्गामध्ये नियोजन, नेतृत्व,सामाजिक बांधिलकी आणि कायदेविषयक उत्तम ज्ञान प्राप्त व्हावे यासाठी त्या नेहमी अग्रेसर असतात.विधी व सामाजिक क्षेत्रातील त्यांच्या भरीव योगदानाबद्दल राष्ट्रीय कार्य दर्पण गौरव पुरस्कार देऊन त्यांना सन्मानित करण्यात येणार असल्याचे महाराष्ट्र लोककल्याणकारी सेवा संस्थेच्या वतीने लेखी पत्राद्वारे कळविण्यात आले आहे.

प्राचार्या म्हणून शिवाजीराव एस.जोंधळे इन्स्टिट्यूट ऑफ लॉ अँड रिसर्च सेंटर,आसनगाव येथे कार्य करतांना विद्यार्थ्यांचे शिक्षण, त्यांचा सर्वांगीण विकास,नैतिक मूल्ये,सामाजिक जाणीव आणि गुणवत्तापूर्ण विधी शिक्षण यासाठी सातत्याने प्रयत्न करण्याची संधी मिळाली.हा सन्मान माझ्या कुटुंबीयांचा, सहकाऱ्यांचा,विद्यार्थ्यांचा आणि माझ्यावर विश्वास ठेवणाऱ्या प्रत्येक व्यक्तीचा आहे असे पुरस्कार जाहीर झाल्यानंतर डॉ. पौर्णिमा एकनाथ सुर्वे यांनी बोलताना सांगितले.

---

# खांडपे गावात कमी दाबाने वीज पुरवठा !

## कर्जत वीज वितरण कंपनीच्या विरोधात आंदोलन छेडण्याचा इशारा



**अक्षराज : जयेश जाधव**

**दि.२७, कर्जत (रायगड) :** कर्जत तालुक्यातील खांडपे या गावात गेले एका वर्षापासून विद्युत वीजपुरवठा कमी दाबाने होत आहे त्यामुळे तेथील नागरिकांना प्रचंड अडचणीला सामोरे जावे लागत आहे याबाबतची लेखी तक्रार नागरिकांनी कर्जत येथील महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीमध्ये करून सुद्धा अधिकारी व कर्मचारी याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करीत असल्याचा आरोप होत आहे.

खांडपे ग्रामस्थांनी कर्जत येथील वीज वितरण कंपनीच्या कार्यालयात दिलेल्या तक्रार म्हटले आहे की कमी दाबाच्या वीज पुरवठ्यामुळे घरातील बलप ,पंखे ,फ्रिज आणि इतर इलेक्ट्रॉनिक उपकरणे चालत नाही. रात्रीच्या वेळी वीजपुरवठा कमी दाबामुळे पुरेसा प्रकाश नसतो ज्यामुळे विद्यार्थ्यांच्या अभ्यासावर परिणाम होत असतो परिणामी विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होते तसेच ग्रामपंचायत पाणीपुरवठा योजनेत च्या मोटारी सुद्धा कमी दाबाच्या वीज पुरवठ्याच्या समस्यामुळे पूर्ण क्षमतेने चालू शकत नाही त्यामुळे पाणीपुरवठा विस्कळीत होऊन गावात भीषण पाणीटंचाई निर्माण होत आहे.

खांडपे गावात कमी दाबाने वीज पुरवठा बाबतची समस्या ही एक वर्षापासून सतावत आहे याबाबत स्थानिक स्तरावर वारंवार लेखी तोंडी तक्रारी करून अद्याप कोणतीच ठोस कारवाई आजपर्यंत झालेली नाही असे येथील स्थानिक नागरिकांचे म्हणणे आहे गावाचा वाढता विस्तार पाहता सध्याचे ट्रांसफार्मर (रोहित्र) अपुरे पडत आहे का? अन्य काही तांत्रिक बिघाड आहे का याची पातळीने तपासणी आवश्यक त्या सुधारणा कराव्या आवश्यक असल्यास नवीन क्षमतेचे ट्रान्सफॉर्मर बसून नियमित योग्य दाबाने वीज पुरवठा सुरळीत व्हावा अशी मागणी ग्रामस्थांनी शेवटी तक्रारीत नमूद केली आहे.

जर येत्या काही दिवसात वीज पुरवठा योग्य दाबाने सुरळीत न केल्यास तीव्र आंदोलन छेडावे लागेल असा इशारा खांडपे ग्रामस्थांनी कर्जत येथील वीज वितरण कार्यालयास देण्यात आला आहे याबाबतचे लेखी निवेदनाची प्रत उप कार्यकारी अभियंता महावितरण कार्यालय कर्जत ,कार्यकारी अभियंता पनवेल, अधीक्षक अभियंता पेण यांनाही पाठविण्यात आले आहे.

---

### बोरी शहरात पोलिसांचे शक्तिप्रदर्शन; सण-उत्सवाच्या पार्श्वभूमीवर पोलिस प्रशासन सतर्क



**अक्षराज : जाफर शेख**

**दि.२७, बोरी (परभणी) :** शहरात सण-उत्सवाच्या पार्श्वभूमीवर कायदा व सुव्यवस्था अबाधित राहावी तसेच नागरिकांमध्ये सुरक्षिततेची भावना निर्माण व्हावी, या उद्देशाने बोरी पोलिसांच्या वतीने शहरात भव्य शक्तिप्रदर्शन करण्यात आले. पोलिस अधिकारी, कर्मचारी, वाहनांचा ताफा तसेच पायदळ फेरीद्वारे शहरातील विविध भागांमध्ये पोलिसांची उपस्थिती दर्शविण्यात आली.

शहरातील मुख्य रस्ते, बाजारपेठ परिसर, चौक तसेच संवेदनशील भागातून पोलिसांनी गस्त घालत शक्तिप्रदर्शन केले. यावेळी कायदा हातात घेण्याचा प्रयत्न करणाऱ्यांवर कडक कारवाई केली जाईल, असा अप्रत्यक्ष संदेश पोलिस प्रशासनाकडून देण्यात आला.

सण-उत्सव काळात कोणताही अनुचित प्रकार घडू नये, सामाजिक सलोखा कायम राहावा तसेच नागरिकांनी अफवांवर विश्वास ठेवू नये, असे आवाहनही पोलिस प्रशासनाच्या वतीने करण्यात आले. शहरातील शांतता व सुव्यवस्था कायम ठेवण्यासाठी पोलिस प्रशासन सज्ज असल्याचे या शक्तिप्रदर्शनातून दिसून आले.

### बकरी ईद पार्श्वभूमीवर परभणी जिल्ह्यात गोवंश वाहतूक व खरेदी-विक्रीवर निर्बंध

**अक्षराज : रहीम कोक्कर**

**दि.२७, परभणी :** बकरी ईद सणाच्या पार्श्वभूमीवर परभणी जिल्ह्यात दिनांक ३० मे २०२६ पर्यंत भरणाऱ्या जनावरांच्या आठवडी बाजारांमध्ये गोवंश जातीच्या जनावरांची वाहतूक तसेच खरेदी-विक्रीवर निर्बंध लागू करण्यात आले आहेत. जिल्हादंडाधिकारी संजयसिंह चव्हाण यांनी भारतीय नागरिक सुरक्षा संहिता-२०२३ च्या कलम १६३ अंतर्गत हे आदेश निर्गमित केले आहेत.महाराष्ट्र प्राणी संरक्षण अधिनियम १९९५ मध्ये करण्यात आलेल्या सुधारणेनुसार राज्यात संपूर्ण गोवंश हत्याबंदी कायदा लागू करण्यात आला असून गोवंशाची कत्तल, कत्तलीसाठी वाहतूक, खरेदी-विक्री, निर्यात तसेच गोमांस बाळगण्यास सक्त मनाई करण्यात आली आहे. बकरी ईद सणादरम्यान कायद्याचे उल्लंघन होऊ नये. यासाठी प्रशासनाने विशेष खबरदारी घेतली आहे.जिल्ह्यातील विविध ठिकाणी ३० मे २०२६ पर्यंत भरविण्यात येणाऱ्या आठवडी बाजारांमध्ये कुर्बानीसाठी गोवंश जातीच्या जनावरांची वाहतूक व खरेदी-विक्री होण्याची शक्यता लक्षात घेऊन पोलीस अधीक्षक, परभणी यांनी जिल्हा प्रशासनाकडे निर्बंध लागू करण्याची विनंती केली होती. त्यानुसार संबंधित सर्व विभागांना आवश्यक सूचना देण्यात आल्या आहेत. तसेच सदर आदेशाची माहिती ध्वनीक्षेपकाद्वारे जनतेपर्यंत पोहोचविण्याचे निर्देश प्रशासनाने पोलीस विभागाला दिले असून कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी प्रशासन सतर्क झाले आहे.

---

## अस्वच्छता, ट्रॅफिक आणि नागरिकांच्या गैरसोयीमुळे प्रशासनाला निवेदन




**अक्षराज : सुरेश संकपाळ**

**दि.२७, पाटण (सातारा) :** पाटण शहरातील जुन्या स्टँड परिसरातील शासकीय जागेवरील अतिक्रमण तात्काळ हटवण्यात यावे, अशी मागणी नागरिकांनी उपविभागीय अधिकारी तथा प्रांताधिकारी पाटण यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे. या निवेदनावर अनेक ग्रामस्थ व नागरिकांच्या सह्या करण्यात आल्या आहेत.

निवेदनात म्हटले आहे की, जुन्या स्टँड परिसरात अनेक वर्षांपासून अतिक्रमण झाले असून त्या ठिकाणी कचरा व घाणीचे साम्राज्य निर्माण झाले आहे. त्यामुळे दुर्गंधी पसरत असून नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण होत आहे. रात्रीच्या वेळी काही नागरिक तेथे थांबत असल्याने परिसर अस्वच्छ राहत असल्याची तक्रार करण्यात आली आहे.

सध्या पाटण शहरात रस्ता रुंदीकरणाचे काम सुरू असून अनेक नागरिकांनी स्वतःहून अतिक्रमणे हटवली आहेत. तसेच नवीन स्टँड परिसरातील अतिक्रमणांवरही कारवाई करण्यात आल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. मात्र जुन्या स्टँड परिसरातील शासकीय जागेवरील अतिक्रमण कायम असल्याने नागरिकांनी प्रशासनाचे लक्ष वेधले आहे.

हे अतिक्रमण हटविल्यास शहरातील ट्रॅफिकची समस्या कमी होईल, नागरिकांना वाहन पार्किंगची सुविधा उपलब्ध होईल तसेच प्रवाशांना पावसाळा व उन्हाळ्यात बसण्यासाठी जागा निर्माण होईल, असेही नागरिकांनी निवेदनात म्हटले आहे.

तहसीलदार, मुख्याधिकारी नगर पंचायत पाटण व पोलिस प्रशासन यांच्या सहकार्याने ही कारवाई तातडीने करण्यात यावी, अशी मागणी नागरिकांनी केली आहे. अन्यथा भविष्यात गंभीर परिस्थिती निर्माण झाल्यास प्रशासन जबाबदार राहील, असा इशाराही निवेदनातून देण्यात आला आहे.

या निवेदनावर नितीन पिसाळ, राजाभाऊ काळे, गणेश नाईकवडी, चंद्रकांत कांबळे, शंकर मोहिते, बाबासाहेब सुतार, शुभम उबाळे यांच्यासह अनेक नागरिकांच्या सह्या आहेत.

दरम्यान, या निवेदनाच्या प्रती पालकमंत्री, प्रांत कार्यालय पाटण, तहसीलदार पाटण तसेच पोलीस निरीक्षक पाटण यांना देण्यात आल्या आहेत.

---

## १४ मे रोजी घेतलेला निर्णय रद्द करण्यासाठी २८ जूनला चंद्रपुरात ओबीसीचा महामोर्चा

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.२७, चंद्रपूर :** ओबीसी समाजाची जातनिहाय जनगणना करण्यात यावी आणि वय, शैक्षणिक पात्रता, अनुभव, परीक्षेस बसण्याची संधीची सवलत घेतलेल्या राखीव प्रवर्गातील उमेदवारांची नियुक्ती आता राखीव प्रवर्गातच होणार असून अशा उमेदवारांना खुल्या प्रवर्गातील जागेवर दावा सांगता येणार नाही असा निर्णय महाराष्ट्र सरकारने घेतला आहे. फक्त स्थगिती दिली असली तरी रद्द झालेला नाही आहे आणि सरकारने विधी व न्यायालयाकडे मत मागवले आहे हा निर्णय तात्काळ रद्द करण्यात यावा, यासाठी सहविचार बैठकीचे आयोजन करण्यात आले होते.

राष्ट्रीय ओबीसी महासंघाच्या पुढाकारातून रविवार दि. २४ मे २०२६ रोजी चंद्रपूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या स्वर्गीय दादासाहेब कन्नमवार सभागृहात ओबीसी. विजा. भज, विमाप्र, अनुसूचित जाती व जमाती यांची संयुक्तिकरित्या सहविचार बैठक संपन्न झाली.

या बैठकीत राष्ट्रीय ओबीसी महासंघाचे महासचिव सचिन राजुरकर यांनी ठराव मांडत सर्वानुमते रविवारी दि. २८ जून २०२६ ला चंद्रपूर येथे महामोर्चा ठराव मांडला आणि जोपर्यंत जनगणना आयुक्त ओबीसींची जातिनिहाय जनगणनेसाठी भारत सरकारचे राजपत्र काढत नाही तोपर्यंत जनगणना साठी असहकार करण्याचे आवाहन राजुरकर यांनी केले. यावेळी खासदार प्रतिभा धानोरकर यांनी सुध्दा जोपर्यंत ओबीसींचा कॉलम येत नाही, तो लढा सुरुच राहणार आणि बहुजन समाजावर अन्याय करणारा १४ मे चा निर्णय राज्य सरकारने त्वरित रद्द करावा असे म्हटले. राष्ट्रीय ओबीसी महासंघाचे अध्यक्ष डॉ. बबन तायवाडे यांनी आपल्या अधयक्षीय भाषणात म्हणाले कि, भविष्यात अशीच एकजूट बहुजन समाजात राहावी. महानगर पालिकेचे उपाध्यक्ष प्रशांत दानव, स्थायी समितीचे अध्यक्ष मनस्वी संदीप गिऱ्हे, विकोधी पक्षनेता राजेश अड्डूर, जनविकास सेनेचे पप्पू देशमुख, आदिवासी विकास परिषदेचे प्रमोद बोरीकर, केशव तिराणिक, ॲड. दत्ता हजारे, धनोजे कुणबी समाजाचे अध्यक्ष शीधर मालेकर, राष्ट्रीय ओबीसी महासंघाचे कार्याध्यक्ष प्रा. शेषराव येलेकर, जयदीप रोडे, निलेश नन्नावारे, तसेच महानगर पालिकेचे नगरसेवक वसंता देशमुख, आकाश साखरकर, भालचंद्र दानव, अभिषेक डोईफोडे, रामनरेश यादव, राहुल चौधरी, नगरसेविका सुनंदा धोबे, मनिषा बोबडे, श्वेता लांडगे, भावना बावनकर, तथा ओबीसी योध्दा रवींद्र टोंगे, सतीश भिवगडे, प्रशांत काळे, सुधाकर काकडे, सुर्यकांत खनके, प्रा. अनिल शिंदे, मुन्ना आवळे, प्रा. बबन राजुरकर, देवराव दिवसे, मोरेश्वर सूरकर, शंकर पाल, हरिश्चंद्र गौरकर, प्रभाकर गेडाम, बालू सातपुते, डॉ. विजय हेलवटे, प्रा. रवी झाडे, शाम राजूरकर, नरेन गेडाम, गणेश आवारी, तुळशीराम देरकर, संतोष बांदूरकर, अरविंद मडावी, दत्तू कडूकर, मुबारक शेख, ओबीसी. विजा, भज, विमाप्र, अनुसूचित जाती, जमाती समाजातील कार्यकर्ते उपस्थित होते. कार्यक्रमाचे संचालन कृष्णा मेश्राम तर आभार रामदास कामडी यांनी केले.

# देवीभोयरे-शिवडोह लिंक कॅनॉल कामाला गती

## जलसंपदा मंत्र्यांकडून तातडीच्या कार्यवाहीचे आदेश

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.२७, पारनेर (अहिल्यानगर) :** तालुक्यातील अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या देवीभोयरे- शिवडोह लिंक कॅनॉल प्रश्नावर आज महत्त्वपूर्ण घडाम ोड घडली असून या प्रश्नाला अखेर गती मिळण्याची चिन्हे निर्माण झाली आहेत. देवीभोयरे व वडझिरे परिसरातील शेतकऱ्यांनी लिंक कॅनॉलचे काम तातडीने मंजूर करून सक्तीने भूसंपादन प्रक्रिया पूर्ण करत प्रकल्प मार्गी लावावा, या म ागणीसाठी उपोषणाचा इशारा दिला होता. या पार्श्वभूमीवर प्रशासन व शासन स्तरावर तातडीच्या हालचाली सुरू झाल्या.

आज कृष्णा खोरे प्रकल्पाचे कार्यकारी अभियंता अक्षय बरकले यांनी संबंधित शेतकऱ्यांना मंचर येथे चर्चे साठी बोलावून घेतले. यावेळी पंधरा दिवसांच्या आत भूसंपादन प्रक्रियेबाबत कार्यवाही करण्यात येईल, असे आश्वासन देण्यात आले. यानंतर या प्रश्नाला अधि गती मिळाली.



मतदारसंघातील सर्वसामान्य नागरिक, शेतकरी व ग्रामस्थांचे संवेदनशील प्रश्न, पाणी, सिंचन, शेती व विकासकामांशी संबंधित प्रश्न केवळ बैठकीपुरते मर्यादित न ठेवता संबंधित विभागांकडे सातत्याने माझा पाठपुरावा आहे, देवीभोयरे-शिवडोह लिंक कॅनॉलसारखा रखडलेला प्रश्न मार्गी लागण्यासाठी शेतकऱ्यांच्या भावना शासनापर्यंत पोहोचवत जलसंपदामंत्री विखे पाटीलांशी सातत्याने चर्चा केली. त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना हे काम तातडीने मंजुर करुन मार्गी लावण्याच्या सूचना दिल्या, मतदारसंघातील नागरिकांना न्याय मिळावा, शेतीला पाणी मिळावे आणि ग्रामीण भागाचा विकास व्हावा यासाठी माझा संघर्ष असेल.

**- आमदार काशिनाथ दाते**

पारनेर-नगर विधानसभा म तदारसंघाचे आमदार काशिनाथ दाते यांच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळाने यापूर्वी जलसंपदामंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्याकडे सातत्याने पाठपुरावा केला होता.

शेतकऱ्यांच्या अडचणी व पाण्याचा गंभीर प्रश्न लक्षात घेऊन दाते सरांनी शासन दरबारी वेळोवेळी पाठपुरावा करत हा प्रश्न मार्गी लावण्यासाठी महत्त्वाची भूमिका बजावली. राधाकृष्ण विखे पाटीलांनी देवीभोयरे व वडझिरे येथील नागरिकांसमोरच मुख्य अभियंता चोपडे व धुमाळ यांना लिंक कॅनॉलचे काम तातडीने मंजूर करून सक्तीने भूसंपादन प्रक्रिया पूर्ण करत काम मार्गी लावण्याचे स्पष्ट आदेश दिले.

यावेळी अंबिका माता ट्रस्ट अध्यक्ष शिवाजीराव जाधव, विश्वनाथ गाजरे, मा. उप सरपंच विकास सावंत, बाबुराव मुळे, व्हा. चेअरमन गोपीचंद बेलोटे, मा. उपसरपंच दत्तात्रय बेलोटे, सुभाष किसन बेलोटे, बाबुराव एकनाथ बेलोटे, अक्षय राजाराम बेलोटे, भाऊसाहेब पोपट सरडे, कमलाकर लहू बेलोटे, यांच्यासह अनेक नागरिक उपस्थित होते.

# थोडक्यात

## हॉटेल ग्रामपंचायतच्या मालकीण रोहिणी पाराध्येची आत्महत्या; ब्रह्मपुरीतील घटनेने खळबळ



**अक्षराज : विकास सरवळे**

**दि.२७, पंढरपूर :** मंगळवेढा तालुक्यातील ब्रह्मपुरी येथील हॉटेल ग्रामपंचायतच्या मालकीण रोहिणी निलेश पाराध्ये (वय २५) यांनी अज्ञात कारणावरून गळफास घेऊन आत्महत्या केल्याची धक्कादायक घटना घडली आहे. या घटनेमुळे परिसरात खळबळ उडाली असून सोशल मीडियावर ही हळहळ व्यक्त केली जात आहे.याबाबत पती निलेश पाराध्ये यांनी पोलिसांत खबर दिली आहे. दिनांक २६ मे २०२६ रोजी दुपारी साडेदोनच्या सुमारास हॉटेल ग्राम पंचायतच्या स्वयंपाकघरातील पत्र्याच्या लोखंडी अंगलाला दोरीच्या सहाय्याने रोहिणी यांनी गळफास घेतल्याचे आढळून आले. त्यानंतर त्यांना तातडीने मंगळवेढा ग्रामीण रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले. मात्र, डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले.रोहिणी पाराध्ये आणि त्यांचे पती निलेश पाराध्ये हे विविध सामाजिक विषय तसेच खाद्यपदार्थांवरील रील्समुळे सोशल मीडियावर लोकप्रिय झाले होते. त्यांच्या या लोकप्रियतेच्या जोरावर त्यांनी रत्नागिरी-नागपूर राष्ट्रीय महामार्गावरील ब्रह्मपुरी येथे हॉटेल ग्रामपंचायत हा व्यवसाय सुरू केला होता. व्यवसायात स्थिरावत असताना आणि नव्या शाखेची तयारी सुरू असतानाच रोहिणी यांनी टोकाचे पाऊल उचलल्याने सर्वत्र हळहळ व्यक्त होत आहे. या प्रकरणाचा पुढील तपास पोलिसांकडून सुरू आहे.

# १५ वर्षांचा वनवास संपला; हनुमान नगर-विष्णू नगर शिव रस्ता अखेर खुला

**अक्षराज : सुनील क्षिरसागर**

**दि.२७, विंचूर (नाशिक) :** गेल्या १५ वर्षांपासून बंद असलेला आणि शेतकऱ्यांच्या वादात अडकलेला हनुमान नगर ते विष्णू नगर हा शिव रस्ता (पाणंद रस्ता) प्रशासनाच्या सातत्यपूर्ण प्रयत्नांमुळे अखेर पूर्णपणे खुला झाला आहे. महाराष्ट्र राज्य शिव पाणंद शेत रस्ते चळवळीच्या पाठपुराव्याला आणि महसूल, पोलीस व भूमी अभिलेख प्रशासनाच्या संयुक्त मोहिमेला अखेर यश आले असून, यामुळे परिसरातील शेतकऱ्यांनी मोठा सुटकेचा श्वास सोडला आहे.

**असा सुटला १५ वर्षांचा तिढा...**

महाराष्ट्र राज्य शिव पाणंद चळवळीच्या मागणीची दखल घेत जिल्हाधिकाऱ्यांनी २४ डिसेंबर २०२४ रोजी एक परिपत्रक काढले होते. त्यानुसार निफाडचे उपविभागीय अधिकारी शशिकांत मंगरुळे, तहसीलदार विशाल नाईकवाडे आणि भूमी अभिलेख उपअधीक्षक राजेंद्र भाबड यांच्या आदेशान्वये, ३० मे २०२५ रोजी भूकरमापक शैलेंद्र सिंग राजपूत यांनी या रस्त्याची अधिकृत मोजणी व सीमांकन (हद्दी निश्चिती) पूर्ण केली होती.

**दोन टप्प्यांत झाली कारवाई**

हा रस्ता एकूण १७०० फूट लांबीचा आहे. विंचूरचे मंडळ अधिकारी संतोष डुंबरे यांनी पोलीस व ग्राम पंचायत प्रशासनाच्या मदतीने गेल्या ९ महिन्यांपासून सातत्याने प्रयत्न करून ११ ऑगस्ट २०२६ रोजी



पहिल्या टप्प्यात ८०० फूट रस्ता खुला केला होता. मात्र, उर्वरित ९०० फूट रस्ता खुला करण्यास लगतच्या शेतकऱ्यांचा विरोध असल्याने मंडळ अधिकाऱ्यांना वारंवार तारखा बदलाव्या लागत होत्या.

**सामोपचाराने काढला मार्ग**

रस्त्याचा तिढा सोडवण्यासाठी महाराष्ट्र राज्य शिव पाणंद शेत रस्ते चळवळीचे राज्य समन्वयक दादासाहेब जंगले पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली निफाड कृती समितीचे सदस्य विजय दरेकर, ज्ञानेश्वर भडांगे, दीपक घायाळ आणि मंडळ अधिकारी संतोष डुंबरे यांनी पुढाकार घेतला. त्यांनी लगतच्या दोन्ही बाजूंच्या शेतकऱ्यांची संयुक्त बैठक घेऊन त्यांच्यात सामोपचाराने समझोता घडवून आणला.

**अखेर काल संध्याकाळी रस्ता मोकळा!**

या समझोत्यानुसार, २५ व २६ मे रोजी विंचूरचे मंडळ अधिकारी संतोष डुंबरे, लासलगावचे सहाय्यक पोलीस निरीक्षक (API) दीपक पाटील, पोलीस कर्मचारी कांदळकर, सागर आरोटे, आनंद गोटम, शुभम पाटसकर, महसूल अधिकारी किरण क्षिरसागर, पोलीस पाटील अमोल गुंजाळ, कृती समितीचे सदस्य विजय दरेकर आणि गजेंद्र शिंदे यांच्या उपस्थितीत प्रत्यक्ष कामाला सुरुवात झाली. मंगळवारी (२६ मे) संध्याकाळी ७:३० वाजेपर्यंत १८ ते २२ फूट रुंदीचा आणि उर्वरित ९०० फूट लांबीचा रस्ता पूर्णपणे साफ करून खुला करण्यात आला.या मोहिमेच्या वेळी लगतचे शेतकरी दिनेश शिळमकर, ज्ञानेश्वर सालगुडे, नवनाथ सालगुडे, राहुल शिळमकर, भास्कर गुंजाळ, गोरख सालगुडे, रामदास सालगुडे, सुकदेव सालगुडे, नंदू गांगुर्डे, गणेश सालगुडे, मयूर गुंजाळ आदी उपस्थित होते.

**शासकीय नोंद**

हनुमान नगर-विष्णू नगर या अधिकृत शिव रस्त्याचा शासकीय क्रमांक 04-10-082-006-E असा आहे. १५ वर्षांनंतर हक्काचा रस्ता मिळाल्यामुळे शेतकऱ्यांची वर्षानुवर्षांची वाहतुकीची अडचण दूर झाली आहे. या यशस्वी कामगिरीबद्दल परिसरातील शेतकऱ्यांनी आनंद व्यक्त करत महसूल प्रशासन, भूमी अभिलेख विभाग, पोलीस प्रशासन आणि ग्रामपंचायत प्रशासनाचे जाहीर आभार मानले आहेत.

## शासनाच्या नियमांचे पालन करूनच बकरी ईद साजरी करा



**अक्षराज : रहीम कोक्कर**

**दि.२७, जिंतूर (परभणी) :** आगामी २८ मे रोजी साजरी होणाऱ्या बकरी ईदच्या पार्श्वभूमीवर जिंतूर शहरातील सुलेमानी मस्जिद येथे ईदगाह नमाज वेळ, नियोजन व सामाजिक जबाबदारी संदर्भात महत्त्वपूर्ण बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. बैठकीस मुस्लिम समाजातील उलेमा, सामाजिक कार्यकर्ते, म स्जिद कमिटी सदस्य तसेच नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.बैठकीत सर्वानुमते गुरुवारी सकाळी ८:३० वाजता ईदगाह नमाज अदा करण्याचा निर्णय घेण्यात आला. यावेळी जमीयते उलेमा मराठवाडाचे सदर मौलाना अब्दुल जलील यांनी समाजाला संबोधित करत शासनाच्या आदेशांचे काटेकोर पालन करण्याचे आवाहन केले. ते म्हणाले की, बकरी ईद हा त्याग, संयम आणि बंधुभावाचा सण आहे. त्यामुळे कोणत्याही परिस्थितीत शासनाने बंदी घातलेल्या जनावरांची कुर्बानी करू नये. सर्व मुस्लिम समाजाने कायद्याचा आदर राखत शांततेत आणि शिस्तबद्ध वातावरणात ईद साजरी करावी.मौलाना जलील यांनी पुढे सांगितले की, काही समाजकंटक किंवा अफवांमुळे समाजाची बदनामी होऊ शकते. त्यामुळे प्रत्येक नागरिकाने जबाबदारीने वागून शासन निर्णयाचे उल्लंघन होणार नाही याची दक्षता घ्यावी. सोशल मीडियावरही कोणतीही आक्षेपार्ह पोस्ट किंवा व्हिडिओ प्रसारित करू नयेत, असे आवाहनही त्यांनी केले.बैठकीदरम्यान सुलेमानी ईदगाह परिसरातील स्वच्छता, वाहतूक नियंत्रण, पार्किंग व्यवस्था, नमाजासाठी येणाऱ्या नागरिकांची सुविधा तसेच कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी आवश्य उपाययोजनांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. तरुणांनी स्वयंसेवक म्हणून पुढाकार घेऊन प्रशासनाला सहकार्य करण्याचेही निश्चित करण्यात आले. यावेळी उपस्थित मान्यवरांनी सर्व समाजबांधवांनी एकोपा, प्रेम आणि सामाजिक सलोखा कायम ठेवत ईद साजरी करण्याचे आवाहन केले. बैठकीच्या शेवटी देशात सद्या सुरू असलेल्या देशावरचे संकट शांतता, प्रगती आणि भाईचारा कायम राहावा. यासाठी विशेष दुआ करण्यात आली.

## मिनी ट्रेनच्या वाढीव फेऱ्यासाठी नवीन इंजन्सी मागणी



**अक्षराज : चंद्रकांत सुतार**

**दि.२७, माथेरान :** माथेरानची ओळख बनलेल्या ऐतिहासिक मिनिट्रेनच्या फेऱ्यांमध्ये वाढ करण्यासाठी नवीन इंजिन्स तातडीने उपलब्ध करून द्यावीत, अशी मागणी माथेरान नगरपालिकेचे नगराध्यक्ष चंद्रकांत चौधरी यांनी मावळचे खासदार श्रीरंग बारणे यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे. खासदार बारणे हे दि.२६ मे २०२६ रोजी कर्जत रेल्वे स्थानकाच्या पाहणी दौऱ्यावर आले असताना हे निवेदन त्यांना सुपूर्द करण्यात आले.

सध्या अमन लॉज ते माथेरान स्टेशनदरम्यान सुरू असलेल्या शटल सेवेमध्ये एक प्रथम श्रेणी आणि दोन द्वितीय श्रेणीचे डबे उपलब्ध आहेत. पर्यटकांची मोठ्या प्रमाणावर ये-जा होत असली तरी आसन क्षमता कमी असल्याने अनेकांना तिकीट मिळत नाही. त्यामुळे पर्यटकांचा हिरमोड होत असून शटल सेवेत आणखी दोन द्वितीय श्रेणीचे डबे वाढविण्याची मागणी निवेदनात करण्यात आली आहे. याशिवाय अमन लॉज ते माथेरान स्टेशनदरम्यानच्या रेल्वेमार्गालगत असलेली खडी सततच्या वर्दळीमुळे विस्कळीत होत असल्याने रेल्वे मार्गाच्या दोन्ही बाजूंना पेव्हर ब्लॉक बसवून चालण्यायोग्य मार्ग तयार करावा, अशीही सूचना करण्यात आली आहे.

माथेरानमध्ये बांधकाम साहित्य आणि इतर आवश्यक वस्तू वाहतुकीअभावी महाग मिळत असल्याचे सांगत, नेरळ ते माथेरानदरम्यान पूर्वी सुरू असलेली मालगाडी सेवा पुन्हा सुरू करण्याची मागणीही नगराध्यक्ष चौधरी यांनी केली आहे. यामुळे सर्वसामान्य नागरिकांना कमी दरात साहित्य उपलब्ध होण्यास मदत होईल, असे त्यांनी नमूद केले. यावेळी नगराध्यक्ष चंद्रकांत चौधरी म्हणाले की, हेरिटेज दर्जा प्राप्त झालेल्या मिनिट्रेनची सेवा अधिक सक्षम होणे आवश्यक आहे. देश-विदेशातील पर्यटक विशेषतः या ट्रेनच्या प्रवासासाठी माथेरानला भेट देतात. नवीन इंजिन्स उपलब्ध झाल्यास गाडीच्या फेऱ्या वाढून पर्यटनालाही मोठी चालना मिळेल. तसेच खासदार श्रीरंग बारणे हे माथेरानच्या प्रश्नांबाबत सकारात्मक असून यावर योग्य तो मार्ग काढतील, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

## वरोती येथे राष्ट्रवादी काँग्रेसकडून ईद निमित्त कार्यक्रम




**अक्षराज : निलेश कासट**

**दि.२७, डहाणू (पालघर) :** डहाणू तालुक्यातील वरोती येथे बुधवार, दिनांक २७ मे २०२६ रोजी राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (अजित पवार गट) यांच्या वतीने ईद निमित्त विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष, डहाणू तालुका यांच्या माध्यमातून आयोजित या कार्यक्रमात पक्षाच्या पदाधिकाऱ्यांनी कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करत संघटन मजबूत करण्याचा संदेश दिला. तसेच विविध गावांतील युवक व ग्रामपंचायत सदस्यांनी पक्षात जाहीर प्रवेश केल्याने कार्यक्रमाला विशेष महत्त्व प्राप्त झाले.

यावेळी जिल्हाध्यक्ष आनंद ठाकूर यांनी कार्यकर्त्यांना संबोधित करताना सांगितले की, मागील अनेक वर्षांपासून पालघरच्या ग्रामीण भागात राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष हा सर्वसामान्य नागरिकांच्या प्रश्नांसाठी सातत्याने काम करणारा पक्ष राहिला आहे. कार्यकर्त्यांनी समाजसेवा करताना वैयक्तिक स्वार्थ बाजूला ठेवून ग्रामपंचायत, तालुका आणि जिल्हास्तरावरील नागरिकांच्या प्रश्नांकडे गांभीर्याने लक्ष देणे आवश्यक असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. तर पक्षाचे उपाध्यक्ष पांडुरंग बेलकर यांनी डहाणू तालुक्यात राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची ताकद दिवसेंदिवस वाढत असून विविध गावांमधील युवक आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने पक्षात सहभागी होत असल्याचे सांगितले. आगामी काळात ग्रामीण भागात पक्ष अधिक सक्षम करण्यासाठी सर्वांनी एकजुटीने काम करण्याचे आवाहन त्यांनी केले.

या कार्यक्रमात वरोती व कासा ग्रामपंचायत हद्दीतील काही ग्रामपंचायत सदस्यांसह अनेक युवक कार्यकर्त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात जाहीर प्रवेश केला. पक्षात प्रवेश करणाऱ्या सर्वांचे पदाधिकाऱ्यांच्या हस्ते पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले. कार्यक्रमास जिल्हा उपाध्यक्ष अशोक भोईर, नलावडे, तालुका अध्यक्ष विपुल राऊत, हरेश मुकणे, जितू पटेल, यतीन नम, सुदाम कदम, महिला पदाधिकारी स्वाती राऊत तसेच मोठ्या संख्येने कार्यकर्ते व नागरिक उपस्थित होते.

## वृक्षतोड, डोंगर उत्खनन आणि वाढत्या तापमाना विरोधात प्रशासनाला निवेदन

### ३१ मे रोजी होणार भव्य मानवी साखळी आंदोलन

**अक्षराज : सुनिल फर्डे**

**दि.२७, शहापूर (ठाणे) :** शहापूर तालुक्यात वाढते तापमान,बेसुमार वृक्षतोड, डोंगर उत्खनन, जलस्रोतांचे आटत चाललेले अस्तित्व आणि पर्यावरणाच्या होत असलेल्या विनाशाविरोधात आता नागरिक आक्रमक झाले असून शहापूर पर्यावरण संरक्षण मंचच्या वतीने येत्या रविवार, दिनांक ३१ मे २०२६ रोजी सकाळी ८ ते ९ या वेळेत शहापूर बाजारपेठेत भव्य मानवी साखळी आंदोलन करण्यात येणार आहे. या आंदोलनाच्या माध्यमातून ठाणे जिल्हाधिकारी यांना निवेदन देत प्रशासनाचे लक्ष वेधण्यात येणार असून शहापूर तालुक्याचा निसर्ग वाचवण्यासाठी तातडीच्या उपाययोजनांची मागणी करण्यात आली आहे. मुंबई-आग्रा महामार्ग, शहापूर-म ुरबाड-पाटगाव खोपोली महामार्ग व समृद्धी महामार्गाच्या कामासाठी तालुक्यातील हजारो जुनी व डेरेदार झाडे तोडण्यात आली.मात्र नियमाप्रमाणे पर्यायी वृक्षारोपण आणि संगोपनाची प्रभावी अंमलबजावणी झाली नसल्याचा आरोप करण्यात आला आहे. हायवे प्राधिकरणाच्या वृक्षारोपणाचे 'थर्ड पार्टी ऑडिट' करून दोषींवर कारवाई करण्याची मागणी करण्यात आली आहे.तसेच सामाजिक वनीकरण विभागाकडून कोट्यवधी रुपयांचा खर्च होऊनही प्रत्यक्षात झाडे दिसत नसल्याची खंत व्यक्त करण्यात आली.महामार्गच्या दुतर्फा केवळ देशी आणि सावली देणाऱ्या वृक्षांची लागवड करून त्यांच्या पाच वर्षांच्या संगोपनाची जबाबदारी निश्चित करावी.दरवर्षी जंगलात लागणाऱ्या मानवनिर्मित वनव्यांमुळे जैवविविधतेचे मोठे नुकसान होत असून वनवे रोखण्यासाठी वन विभागाला आधुनिक साधने उपलब्ध करून स्थानिक तरुणांना 'वनरक्षक' म्हणून रोजगार द्यावा. महामार्गाच्या कामासाठी सुरू असलेल्या बेसुम ार डोंगर उत्खननामुळे नैसर्गिक थंड हवेचे प्रवाह थांबल्याचा आरोप करत शहापूर तालुक्यात डोंगर पोखरण्यावर संपूर्ण बंदी करावी.याशिवाय नद्या, नाले, तलाव, विहिरी आणि नैसर्गिक जलस्रोत कोरडे पडत असल्याने भविष्यात गंभीर पाणीटंचाई निर्माण होण्याची भीती व्यक्त करण्यात आली आहे.नदी-नाल्यांचे खोलीकरण, रुंदीकरण आणि पुनरुज्जीवनासाठी विशेष निधी देण्याची मागणीही करण्यात आली आहे.भविष्यातील पिढीमध्ये पर्यावरणाबाबत जागृती निर्माण व्हावी यासाठी तालुक्यातील सर्व शाळा, महाविद्यालये,शासकीय कार्यालये, औद्योगिक वसाहती आणि सार्वजनिक ठिकाणी मोठ्या प्रमाणावर देशी वृक्षांची लागवड करून त्यांचे संगोपन सक्तीचे करून शहापूरचा निसर्ग वाचवण्यासाठी आता प्रशासनाने केवळ बैठका न घेता ठोस निर्णय घेण्याची वेळ आली आहे. अशी भूमिका शहापूरकर व पर्यावरण संरक्षण मंचने घेतली आहे.